CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Dec 11, 2024

# मुंबईतील राडारोडा नवी मुंबईत, २० डम्पर जप्त

## 'सिडको'च्या दक्षता विभागाचा दणका

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** मुंबईतील राडारोडाची वाहतूक करून त्याची नवी मुंबई क्षेत्रात त्याची विल्हेवाट लावणाऱ्या डेब्रिजमाफियांच्या विरोधात सिडकोने कारवाईचा फास आवळला आहे. याअंतर्गत गेल्या आठ दिवसांत डेब्रिजचे तब्बल २० डंपर जप्त करून संबंधित चालकांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. विशेष यातील १४ डंपर एकच दिवशी म्हणजे रविवारी जप्त केले आहेत. त्यामुळे ड्रेब्रिजमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

मुंबई आणि उपनगरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. तेथे तयार होणाऱ्या डेब्रिजची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न संबंधित विकासक आणि कंत्राटदारांना सतावत आहे. त्यामुळे अनेक जण अर्थपूर्ण समझोता करून डेब्रिजने भरलेले डंपर थेट नवी मुंबईत आणत आहेत. नवी मुंबईतील सिडको संपादित मोकळे भूखंड, सार्वजनिक वापराच्या जमिनी तसेच खारफुटी क्षेत्रात डेब्रिजचे डंपर रिकामे केले जात आहेत.

### पोलिसांत गुन्हा दाखल

- यासंदर्भातील वाढत्या तक्रारीची दखल घेऊन सिडकोने डेब्रिज माफियांच्या विरोधात कारवाई मोहीम सुरु केली आहे. त्यासाठी विशेष दक्षता पथक तैनात केले आहेत. गुरुवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास अटल सेतू मार्गे मुंबईतून उलवे परिसरात प्रवेश केलेले डेब्रिजचे १४ डंपर दक्षता पथकाच्या निदर्शनास आले.
- **डंपरमधील डेब्रिज टाकण्याच्या तयारीत असतानाच दक्षता पथकाने कारवाई करून ते जप्त केले. संबंधित १४ डंपरचालकांच्याविरोधात न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**
- उलवे परिसरात डेब्रिजचा डंपर रिकामा करण्याच्या बेतात असलेल्या एका चालकाच्याविरोधात मंगळवारी गुन्हा दाखल केला आहे. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्यांच्या विरोधात ही धडक मोहीम सुरु केली आहे. वर्षभरात शेकडो डंपर जप्त केले आहेत.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**नवराष्ट्र** | मुंबई, ११ डिसेंबर २०२४

# सिडकोने पकडले डेब्रिज टाकणारे डंपर

**नवी मुंबई,** (वा.) नवी मुंबई क्षेत्रात सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमीनीवर / भूखंडावर मोठया प्रमाणात अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्याविरुद्ध धडक कारवाई करण्यात आली. डंपर वाहन चालकाकडून डेब्रीज टाकण्यात येत आहेत सदरचे डेब्रीज हे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको



यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रीकी विभाग व पोलीस विभाग यांचेसह दिनांक ०८ डिसेंबर २०२४ रोजी सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असताना संध्याकाळी चार वाजताचे सुमारास एकूण १४ डंपर मधून त्यावरील चालक मानवी जीवीतास/लोकांच्या आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज/माती एमटीएचएल अटल सेतु, मुंबई ते उलवे रोड, सेक्टर-१२, उलवे नवी मुंबई परिसरात खाली करण्याच्या प्रयत्नात असताना मिळून आले. डंपर क्रमांक व त्यावरील चालक अशा एकूण १४ जणांना पकडण्यात आले. त्याचसोबत दुसऱ्या दिवशी डंपर चालक जितेंद्र कुमार कनोजिया याला अटक करण्यात आली.

## चालकांविरुद्ध गुन्हा दाखल

९ डिसेंबर रोजी उलवे येथे सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असताना संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास डंपरचालक जितेंद्र कुमार कनोजिया, वय २५ वर्षे, रा. वडाळा मुंबई हा तो चालवित असलेल्या डंपरमधून डेब्रीज/माती वाहतूक करून प्लॉट नंबर ४९, से.-१८, ब्रिजजवळ उलवे येथे खाली करण्याच्या प्रयत्नात असताना सिडकोच्या पथकाने पकडले. सर्व डंपर चालकांच्या विरुद्ध न्हावाशेवा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी. एन. सी.) २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






नव शक्ति
मुंबई, बुधवार, ११ डिसेंबर २०२४

# अनधिकृतरीत्या डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई** : उलवेमधील सिडकोच्या मोकळ्या जागेत अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्यासाठी आलेले १४ डम्पर सिडकोच्या पथकाने वाहतूक पोलिसांच्या मदतीने पकडण्याची कारवाई रविवारी सायंकाळी उलवेमध्ये केली. या कारवाईत पोलिसांनी सर्व डंपर जप्त करून चालकांना ताब्यात घेतले आहे. सदर चालक मुंबईतील डेब्रिज उलवेमध्ये मोकळ्या जागेत टाकण्यासाठी आल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. पोलिसांनी आता सदरचे डेब्रिज टाकण्यास सांगणाऱ्या डेब्रिज माफियांचा शोध सुरू केला आहे. या सर्व चालकांविरुद्ध उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**Newsband** Wednesday, 11 December 2024

# 14 dumpers caught illegally dumping hazardous debris in Ulwe, Navi Mumbai

By Crime Reporter

**Navi Mumbai:** In a joint operation on Sunday evening, CIDCO officials, with the assistance of the Nhava Sheva Traffic Police, intercepted 14 dumpers illegally dumping debris in CIDCO's open space in Ulwe. The operation led to the seizure of all the dumpers and the detention of their drivers.

Preliminary investigations revealed that the debris, consisting of hazardous materials like rubble, soil, and stones, was being transported through Atal Setu to be dumped in Ulwe. These materials are known to pose risks to human health.

The operation began when officials from the Nhava Sheva Traffic Branch intercepted one of the dumpers. Upon questioning the driver, it was confirmed that the debris was intended to be dumped in the Ulwe area. Senior Police Inspector Mujawar of the Traffic Branch immediately informed CIDCO officials.



Assistant Executive Engineer Neeraj Mahesh and his team from CIDCO (Ulwe-2) rushed to the spot to assess the situation. Upon inspection, they discovered all 14 dumpers filled with the hazardous debris. Acting swiftly, the team detained the vehicles and their drivers.

A case has been registered against the drivers at Ulwe Police Station under Sections 271 and 62 of the relevant legal provisions. The police are now focusing on identifying the debris mafia involved in directing the illegal dumping.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 2 Dec 11, 2024

# दोन बांधकामांवर सिडकोचा हातोडा



लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नेरूळ विभागात सुरू असलेल्या दोन बेकायदा बांधकामांवर सिडकोने मंगळवारी कारवाई केली. नेरूळगावात राम ठकूर यांनी सुरू केलेल्या ४८६ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावरील दोन मजल्यापर्यंतच्या पक्क्या बांधकामावर कडेकोट पोलिस बंदोबस्तात हातोडा मारला. सेक्टर २० मध्ये इंद्रायणी ढाकणे यांच्या २१६ चौ.मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर सुरू असलेल्या विनापरवाना बांधकामावर कारवाई केली. दोन्ही बांधकामधारकांना एमआरटीपी ॲक्टनुसार नोटीस बजावली होती. मात्र, त्यानंतरही बांधकाम सुरूच ठेवल्याने अखेर सिडको आणि महापालिकेने संयुक्त मोहीम राबवून ही बांधकामे जमीनदोस्त केली. याअंतर्गत एकूण १४ स्लॅब या कारवाईत निष्कासित केले.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई |
| बुधवार, ११ डिसेंबर २०२४

# १४ डम्परवर कारवाई



**नवी मुंबई :** उलवेमधील सिडकोच्या मोकळ्या जागेत बेकायदा राडारोडा टाकण्यासाठी आलेले १४ डम्पर सिडकोच्या पथकाने वाहतूक पोलिसांच्या मदतीने पकडण्याची कारवाई रविवारी सायंकाळी उलवेमध्ये केली. पोलिसांनी सर्व डम्पर जप्त केले आहेत. डम्परचालकांवर गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे. हे चालक मुंबईतील राडारोडा उलवेमध्येटाकण्यासाठी आल्याचे चौकशीत आढळून आले आहे. पोलिसांनी आता हा राडारोडा टाकण्यास सांगणाऱ्या राडारोडा माफियांचा शोध सुरू केला आहे. हे सर्व डम्परचालक अटल सेतूमार्गे उलवेमध्ये आले होते. न्हावशेवा वाहतूक शाखेच्या अंमलदारानी त्यांना अडवून चौकशी केली असता हा प्रकार आढळून आला.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

पुण्यनगरी
Navi Mumbai Edition
Dec 11, 2024 Page No. 04

# उलवेत डेब्रिज टाकणाऱ्यांची धरपकड

## सिडको, पोलिसांकडून १४ डंपरवर कारवाई



। उलवे : उलवेमधील सिडकोच्या मोकळ्या जागेत अनधिकृतपणे डेब्रिज टाकणारे १४ डम्पर सिडकोने जप्त करत वाहतूक पोलिसांच्या मदतीने चालकांना ताब्यात घेतले. मुंबईतील डेब्रिज उलवेमधील मोकळ्या जागेत आणून टाकले जात असल्याचे चालकांच्या चौकशीत आढळून आले. पोलीस आता चालकांना हे कृत्य करायला सांगणाऱ्या डेब्रिजमाफियांचा शोधात आहेत.

रेबिट, माती, दगडाचा समावेश असलेले डेब्रिज मानवी आरोग्यास धोकादायक आहे. हे डेब्रिज सिडकोच्या मोकळ्या जागेत टाकण्यासाठी अटल सेतूमार्गे उलवेमध्ये आले होते. न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या अंमलदारांनी हे डंपर अडवून चालकाकडे चौकशी केली असता, ते उलवे परिसरात डेब्रिज टाकण्यासाठी जात असल्याचे आढळून आले. त्यानंतर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना याबाबतची माहिती दिल्यानंतर सिडकोचे सहाय्यक कार्यकारी अभियंता (उलवे २) नीरज महेश व त्यांच्या पथकाने उलवेत धाव घेऊन डंपरची तपासणी केली. यावेळी त्यात रेबीट, माती व दगड असे मानवी आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज आढळून आले. त्यामुळे सिडकोच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने १४ डंपर व चालकांना ताब्यात घेतले. या सर्व डंपर चालकांविरोधात उलवे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

बुधवार, ११ डिसेंबर २०२४ लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM महामुंबई

# राडारोडा टाकणाऱ्या २० डम्परवर कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** सिडकोच्या दक्षता विभागाच्या मार्गदर्शनाखाली मागील आठ दिवसांत वेगवेगळ्या पथकांनी २० डम्परचालकांना डम्पर आणि राडारोड्यासह पकडले. मुंबईतून अटल सेतूमार्गे बेकायदा राडारोडा वाहतूक करून उलवे येथे टाकत असताना सिडकोच्या भरारी पथकाने ही कारवाई केली.

सिडकोच्या मालकीच्या क्षेत्रात बेकायदा राडारोडा टाकणाऱ्यांना पकडण्यासाठी सिडको दक्षता विभागाचे प्रमुख सुरेश मेंगडे यांनी पोलीस व सिडकोचे अभियांत्रिकी आणि सुरक्षा विभागाचे संयुक्त पथक स्थापन केले.

३० नोव्हेंबरला सकाळी मानखुर्द येथील तीन डम्परमध्ये बेकायदा राडारोडा घेऊन अटल सेतूमार्गे गव्हाण गावाजवळ डम्पर रिते करत असताना सिडकोच्या पथकाने पकडले. तसेच ८ डिसेंबर रोजी सायंकाळी उलवे येथे सिडकोच्या भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी मुंबईतून अटल सेतूमार्गे उलवे नोडमधील सेक्टर १२ येथे दाखल झालेल्या १४ वेगवेगळ्या संशयित डम्परवाल्यांची चौकशी केल्यावर या डम्परमधील राडारोडा उलवेत भरावासाठी आणल्याचे उघडकीस आले

या प्रकरणी सिडको अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर न्हावाशेवा पोलीस ठाण्यात १४ डम्परचालकांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला (पान ३ वर) आहे. तसेच ९ डिसेंबरला सायंकाळी उलवे येथील सेक्टर १८ मधील भूखंड क्रमांक ४९ येथे चालकाला मुंबईतून राडारोड्याने भरलेल्या डम्परसह पकडले.